# जाहीर आवाहन

## जिल्हा परिषद उपकर योजना सन २०२६-२७ योजनेतून कृषी औजारे

| अ.क्र. | औजाराचे नाव | देय अनुदान मर्यादा रक्कम प्रति नग रू. |
|---|---|---|
| १ | ट्रॅक्टर ( २० P.T.O.H.P. व त्यापुढील) | किंमतीच्या ४०% किंवा जास्तीत जास्त रू.१,२५,०००/- च्या मर्यादेत(यापैकी जी कमी असेल ती) |
| २ | ट्रॅक्टरचलीत रोटाव्हेटर | किंमतीच्या ४०% किंवा जास्तीत जास्त रू.३६,८००/- च्या मर्यादेत(यापैकी जी कमी असेल ती) |
| ३ | मानवचलीत टोकन यंत्र(Dibbler) | किंमतीच्या ५०% किंवा जास्तीत जास्त रू.८,०००/- च्या मर्यादेत(यापैकी जी कमी असेल ती) |
| ४ | स्ट्रॉ चॉपर/श्रेडर/मल्चर माऊंटेड Type ५ ft | किंमतीच्या ४०% किंवा जास्तीत जास्त रू.५८,०००/- च्या मर्यादेत(यापैकी जी कमी असेल ती) |

१) मागणी केलेल्या औजाराचा / यंत्राचा कुटुंबात यापूर्वी कोणत्याही शासकिय योजनेतुन लाभ घेतला नसल्याचे तालुका कृषि अधिकारी यांचे प्रमाणपत्र.

२) मंजुर झालेले औजार/यंत्र डीबीटीद्वारे खरेदी करणे बंधनकारक आहे.

३) पूर्व संमती मिळाल्यापासून पूर्वसंमतीमध्ये दर्शविलेल्या कालावधीत औजार / यंत्र खरेदी करणे बंधनकारक राहील, विहित मुदतीत खरेदी न केल्यास पूर्व संमती रद्द होईल तसेच कोणतेही अनुदान मिळणार नाही.

४) सदर अर्जाद्वारे तयार होणारी पात्रनिवड यादी दिनांक ३१/०३/२०२७ पर्यंत वैद्य राहील त्यानंतर आपोआप रद्द होईल.

५) केंद्र व राज्य शासनाच्या अधिकृत सक्षम तपासणी संस्थांनी यंत्र / औजारे यांचे रीतसर (Testing) करून ते बीआयएस अथवा अन्य सक्षम संस्थानी निश्चित केलेले मानांकन (Standards) / तांत्रिक निकषानुसार असेल.

६) मंजुर झालेले औजार / यंत्र खुल्या बाजारातुन खरेदी करून त्याचे मुळ देयक (Tax invoice) व टेस्ट रिपोर्ट सादर करणे लाभार्थीस बंधनकारक राहील.

७) औजाराची खुल्या बाजारातुन खरेदी करताना बैंक खात्यातुन इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (RTGS/NEFT/IMPS)धनादेश / धनाकर्ष विक्रेत्यास रककम अदा करणे लाभार्थीस बंधनकारक राहील.

८) औजार/यंत्र खुल्या बाजारातुन लाभार्थी स्वतःच्या पसंतीने खरेदी करणार असल्याने औजार / यंत्राच्या गुणवत्तेची सर्वस्वी जबाबदारी लाभार्थींची राहील.

९) सदर योजनेतील लाभार्थ्यांची निवड जिल्हास्तरावर सोडत (लक्की ड्रॉ) पद्धतीने केली जाईल.

**आवश्यक कागदपत्रे.**

१. लाभाथीचे नावे ७/१२ व ८ अ
२. आधार कार्ड
३. बँक पासबुक
४. दिव्यांग असल्यास प्रमाणपत्र
५. अर्जदाराचे नावाचे ट्रॅक्टर RC BOOK (ट्रॅक्टर चलीत औजारांसाठी)

**अर्ज सादर करावयाचा अंतिम दिनांक ११/०९/२०२६**

**अर्ज करावयाचे स्थळ : पंचायत समिती कार्यालय**

*कृषी विभाग, जिल्हा परिषद जालना*